# बिटस् पिलानी गोवा कॅम्पसमधील 'स्तुती' कार्यशाळेचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते उद्घाटन



**सांकवाळ : बिटस् पिलानी गोवा कॅम्पसमध्ये आयोजित केलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत बिटस् पिलानीचे संचालक प्रा. सुमन कुंडू, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. मीनल कौशिक व प्रा. सुनील भांद.**

प्रतिनिधी
वास्को

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याहस्ते सोमवारी बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसतर्फे शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर आणि केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'स्तुती' कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या आवारात आयोजित केलेल्या या एका आठवड्याच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. मीनल कौशिक व प्रा. सुनील भांद व्यासपीठावर उपस्थित होते. स्तुती कार्यशाळेत गोवा आणि इतर राज्यातील विज्ञान किंवा अभियांत्रीकां क्षेत्रात सक्रियपणे सहभागी असलेल्या प्राध्यापक, पीएचडी, पदव्युत्तर व पदवीधर विद्यार्थ्यांसह सुमारे पन्नासजण सहभागी झाले आहेत.

ही कार्यशाळा आयोजित करून गोव्यातील तसेच गोव्याबाहेरील संशोधकांना अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बिटस् पिलानीचे अभिनंदन केले. त्यांनी यावेळी बिटस् पिलानी कॅम्पसच्या प्रयोगशाळा, सेंट्रल सोफिस्टिकेटेड इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी (सीएसआयएफ) आणि बिटस् बिराक बायोनेस्ट इनक्युबेटरला भेट दिली. त्यांनी यावेळी बिटस् पिलानीच्या संशोधन कार्याचे कौतुक केले. 'स्तुती' हा भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचा 'सिनर्जीस्टिक ट्रेनिंग प्रोग्राम युटुलायझींग द सायन्टिफिक ॲण्ड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर' फंडार्थ कार्यक्रम आहे.